कोळशेवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ २२ /२०२६ दि. १७ /०१/२०२६

–: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :–

ज्याअर्थी, कोळसेवाडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत कल्याण पुर्व पुना लिंक रोड वरील खडेगोळवली नाक्यावरील जुना पुल तोडुन त्या ठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम दिनांक २२/०१/२०२६ रोजी पासुन करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	१) पुना लिंक रोड खडेगोळवली नाल्यावरुन विठठ्लवाडी रेल्वे स्टेशन, श्रीराम चौक कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **स्व. आनंद दिघे चौक, स्मशान भुमी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने स्व. आनंद दिघे उडड्राण पुला वरुन – सम्राट चौक येथुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) श्रीराम चौक व विठठ्लवाडी रेल्वे स्टेशन पुर्व कडुन खडेगोळवली नाक्यावरुन चक्कन नाक्याकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **श्रीराम चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने छत्रपती शिवाजी महाराज प्रवेशव्दार, शांतीनगर उल्हासनगर – सम्राटचौक येथुन डावीकडे वळण घेवनु इच्छित स्थळी जातील.
१) हलके वाहन पर्यायी रस्ता :–	कल्याण पूर्व परिसरात राहणाऱ्या नागरिकांना कोळशेवाडी पोलीस स्टेशन किंवा विठठ्लवाडी रेल्वे स्टेशन पूर्व येथे जाण्या–येण्यासाठी अंतर्गत असलेले रस्ते १) काटेमानिवली ब्रिज खालून हनुमान नगर मार्गे जाणारा रस्ता, २) चिंचपाडा रोड, ३) १०० फुटी रोड या मार्गाचा वापर करावा.
२) हलके वाहन पर्यायी मार्ग :–	श्रीराम चौक कडून कल्याण पूर्व कडे येणाऱ्या नागरिकांनी १) विठठ्लवाडी रेल्वे स्टेशन समारील महिला उद्योग केंद्र मार्गे खडेगाळवलीकडे जाणारा रस्ता. २) अपर्णा डेअरी येथून खडेगोळवली कडे जाणाऱ्या रस्त्याचा वापर करावा.

सदर अधिसूचना दि. २२/०१/२०२६ रोजी ००:०१ वा. पासुन पुढे काम पुर्ण होई पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनती आहे.
प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि कोळशेवाडी, कल्याण, डोंबिवली, वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.